**<u>रे.मु.नं.८८/२०१०</u>**

मारुती वि. विजय

नि.क्र. २१९ लगत

प्रतिवादी क्र.०२ तर्फे सा.क्र.०२

<u>प्रतिवादी क्र.०३ तर्फे उलटतपास विधिज्ञ श्री.पी.एस.रानडे यांचेतर्फे –</u>

०३. देवगड पोलिस ठाण्यातील गु.र.क्र.१०/२०११ मध्ये मी तपासिक अंमलदार म्हणून काम पाहिले आहे. गुन्ह्याचा तपास केलेला असल्यास तपासिक अंमलदार म्हणून साक्षी कामी हजर राहताना गुन्ह्याची केस डायरी सोबत आणणे आवश्यक असते याची मला माहिती आहे. मी आज रोजी गु.र.क्र.१०/२०११ ची केस डायरी सोबत आणलेली नाही. हे मला आठवत नाही की, वरील गुन्ह्याची नोंद न्यायालयाच्या आदेशाने झाली होती की, फिर्यादीवरुन पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद केली होती. हे मला आठवत नाही की, सदर गुन्ह्यातील फिर्यादी सीमा तावडे यांनी देवगड पोलिस ठाण्यात दि.०७/०१/२०११ रोजी लेखी तक्रार दिली होती किंवा नाही. पोलिस ठाण्यात तक्रार दिली असल्यास त्याची नोंद स्टेशन डायरीमध्ये घेणे आवश्यक असते. हे मला आठवत नाही की, वरील गुन्ह्याच्या केस डायरीमध्ये फिर्यादीने न्यायालयात दाखल केलेली लेखी फिर्याद दाखल केली होती किंवा नाही. सदर गुन्ह्याच्या तपास कामात दि.०७/०१/२०११ रोजी फिर्यादीने कथन केल्याप्रमाणे तक्रार विचारात घेतली किंवा नाही ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, विधिज्ञ श्री.जोशी यांनी दि.२९/१२/२०१० रोजी दिलेल्या नोटीसमध्ये नमुद

केल्याप्रमाणे मुखत्यारपत्रावर फिर्यादीचा फोटो व सही बनावट असल्याचे नमुद केलेले आहे.

साक्षीदाराने वरील गुन्ह्याची केस डायरी सोबत नसल्याने निश्चितपणे उत्तरे देऊ शकत नसल्याचे कथन करुन केस डायरीसह हजर होणेस मुदत मिळावी अशी तोंडी विनंती केली.

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.03.29 17:21:06 +1000

दि.२९/०३/२०२३.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड